आर. सी. एस. ७९५/२०२५
फातिमा वि. नबीलाल
**निशाणी क्रमांक ६८**

**प्रतिवादी तर्फे साक्षीदार क्रमांक ३ यांचा शपथेवर जबाब**

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | – | अदिनाथ नामदेव गायकवाड, |
| वय | – | २८ वर्षे |
| व्यवसाय | – | नौकरी, एस.बी.आय. बँक, परंडा |
| राहणार | – | ह.मु. परंडा, ता. परंडा, जि. धाराशिव. |

**प्रतिवादीतर्फे सरतपास एन. एम. आय. चौधरी, विधीज्ञ यांच्या मार्फत**

मी एस.बी.आय.बँक शाखा परंडा येथे सहा. शाखाधिकारी म्हणुन कार्यरत आहे. आमचे शाखेस या प्रकरणातील साक्षीसमन्स प्राप्त झालेअसुन त्याप्रमाणे मी आजरोजी कागदपत्र यादी नि.क्र. ६७ सोबत फातिमा नबीलाल शेख यांचे नावे असलेले खाते क्र. ३२१३२४८७८८१ या खात्याचे दि. ०१.०१.२०१२ ते १३.०४.२०२६ पर्यंतचे खातेउतारा दाखल केलेला आहे. सदर खातेउतारा माहिती आमचे बँकेत असलेल्या संगणकीय माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. खातेउता–यावर आमचे बँकेचा शिक्का आहे. खातेउतारा नि.क्र. ६९ वर आहे. खातेउता–यात दि. ०२.०१.२०१८ रोजी रु. ४.०० लाखाची एफ.डी. केलेली नोंद आहे. दि. ०२.०१.२०२० रोजी वर नमुद एफ.डी. मॅच्युअर झालेचे नमुद आहे. दि. ०२.०१.२०२० रोजी रु. ५.०० लाखाची एफ.डी. केल्याचा उल्लेख आहे. दि. ०४.०१.२०२१ रोजी वर नमुद ५.०० लाखाची एफ.डी. मॅच्युअर होवून रु. ५.३४ लाख जमा झालेची नोंद आहे. दि. ०४.०१.२०२१ रोजी रु. ५.५० लाखाची एफ.डी. केल्याची नोंद आहे. दि. ३०.०४.२०२४ रोजी वर नमुद रु. ५.५० लाखाची एफ.डी. मॅच्युअर झालेचे नमुद आहे. दि. ३०.०४.२०२४ रोजी वर नमुद एफ.डी.ची रक्कम रु. ७.९३ लाख रुपये उचलल्याचा उल्लेख आहे.

**वादीतर्फे उलटतपास आय. डी. शेख, विधीज्ञ यांच्याकडून**

साक्षीसमन्स आमचे बँकेतील अकाऊंटंट किंवा माहितगार इसम यांचे नावाने आलेला आहे. वर नमुद बँक खाते दि. १०.०१.२०१२ रोजी आमचे बँकेत उघडण्यात आलेले आहे. सदर बँक खात्यास नॉमिनी नबीलाल गुलाब शेख यांचे नावाचा उल्लेख आहे. दि. ०२.०१.२०१८ रोजी नमुद असलेली एफ.डी.ची रक्कम फातीम शेख यांचेच खात्यातुन एफ.डी. खात्यात जमा करण्यात आलेली आहे. दि. ०२.०१.२०२० रोजी एफ.डी. मॅच्युअर झालेनंतर त्याची रक्कम रु. ४,५२,४५१/– फातीमा शेख यांचेच खात्यात जमा झालेली आहे. दि. ०४.०१.२०२१ रोजी रक्कम रु.

५,३४,६१४/– ही रक्कम फातीमा शेख हिने मुदतपुर्वी एफ.डी. तोडलेमुळे ती रक्कम तिचे खात्यात जमा झालेली आहे. दि. ०४.०१.२०२१ रोजी फातीमा शेख हिने पुन्हा रु. ५.५० लाखाची एफ.डी. तिचे खात्यात जमा असलेल्या रकमेतुन केली आहे. दि. ३०.०४.२०२४ रोजी रु. ६,६७,५१७/– ही एफ.डी. मॅच्युअर झालेनंतर फातीमा शेख यांचे खात्यात जमा झाली आहे. दि. ३०.०४.२०२४ रोजी फातीमा शेख हिने तिचे खात्यात असलेली रक्कम रु. ७.९२ लाख खात्यातुन काढुन घेतलेली आहे. दि. ११.०७.२०२४ रोजी फातीमा शेख हिने १३,५००/– रुपये जमा केल्याची नोंद आहे. फातीमा शेख यांचे बचत खात्यात नबीलाल गुलाब शेख यांनी रक्कम जमा केले बाबतची कोणतीही नोंद दिसुन येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, बँक खात्याचे प्रतीसोबत बँकेचे वतीने प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, बँक खात्याचे प्रतीखाली माझी किंवा संबंधीत क्लार्कची स्वाक्षरी नाही. फातीमा शेख हिचे खात्यात दि. २५.०९.२०२४ पासुन रु. १५,०००/– शिल्लक दाखवित आहे. तिचे खात्यात फक्त व्याजाची रक्कम जमा होत असलेचे दिसुन येत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला बँकेचे वतीने साक्ष देण्याचा अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, चुकीचा खाते उतारा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वाक्षरीत /–

दिनांकः १३.०४.२०२६

**अ. अ. शेख**
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, परंडा